# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक ०५ वा शुक्रवार दि.३१ मे २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## भाजपाचे आ. कराड यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव; वाढदिवसानिमित्त १५१ महिला भजनी मंडळांना साहित्यांचे वाटप

लातूर : – आध्यात्मीक, सामाजिक, शैक्षणिक कार्यासह, राजकारणात अग्रेसर राहून गोरगरीब सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देणारे, शेतकरी, शेतमजूराच्या न्यायहक्कासाठी संघर्ष करणारे भाजपाचे नेते विधान परिषदेचे सदस्य आ. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने लातूर येथील 'प्रयाग या निवासस्थानी भाजपासह विविध राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून तर अनेकांनी दुरध्वनीच्या माध्यमातून जन्मदिनाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या, लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध गावातील १५१ महिला भजनी मंडळांना आ. रमेशअप्पा कराड मित्रपरिवाराच्या वतीने साहित्याचे वाटप करण्यात आले तर जन्मदिनाच्या निमित्ताने विविध गावात समाजउपयोगी उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्यात आला. गोरगरीब व सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी, शेतकरी शेतमजूराच्या न्यायहक्कासाठी सतत संघर्ष करणारे, गरजुंना वेळोवेळी मदत करणारे, कार्यकर्त्यांना बळ देवून मान आणि सन्मान मिळवून देणारे, हजारो कुटूंबांना आरोग्य सेवेच्या माध्यमातून दिलासा देणारे आणि सर्वांना आपलेसे वाटणारे आणि आध्यात्मीक, सामाजिक, शैक्षणिक कार्यासह, राजकारणात अग्रेसर राहून आपल्या कामाचा वेगळा ठसा निर्माण करणारे भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांचा गुरुवार दि. ३० मे २०२४ रोजी जन्मदिवस मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. आ. रमेशअप्पा कराड मित्र परिवाराच्या वतीने लातूर येथील अंबाजोगाई रोड वरील एमआयटी परिसरातील प्रयाग या निवासस्थानी अभिष्ठचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळयाला लातूर ग्रामीणसह जिल्हाभरातील भाजपा व विविध पक्षातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि मित्रपरिवारांनी दिवसभरात आ. रमेशअप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करुन, पुष्पगुच्छ देवून, मिठाई भरवून जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या. अभिष्ठचिंतन करण्यासाठी दिवसभर मोठी गर्दी झाली होती. आ. कराड मित्र परिवाराच्या वतीने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध गावातील १५१ महिला भजनी मंडळांना टाळ, मृदंग, विणा व इतर साहित्याचे वाटप करण्यात आले. त्याच बरोबर रेणापूर आणि लातूर संजय गांधी निराधार योजना समितीच्या वतीने दोन्ही तालुक्यातील प्रत्येकी पाचशे या प्रमाणे एकूण १ हजार विधवा महिलांना साडीचोळीचे वाटप करण्यात आले. रेणापूर तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने येत्या शैक्षणिक वर्षातील जिल्हा परिषद शाळेतील गोरगरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना ११ हजार १११ वह्यांचे वाटप करण्यात येणार असून प्रातिनिधीक स्वरुपात वह्यांचे वाटप करुन या उपक्रमाचा शुभारंभ जन्मदिनाच्या निमित्ताने करण्यात आला. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील अनेक गावागावात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी ग्रामदेवतांचा अभिषेक, महापूजा व आरती करून आ. रमेशअप्पा कराड यांना दिर्घायुष्य लाभावे यासाठी प्रार्थना केली. तर अनेक ठिकाणी सर्वरोग निदान शिबीर, रक्तदान शिबीर घेण्यात आले, विविध ठिकाणच्या शिबीरात रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. अनेक रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले असून रेणापूर तालुका भाजयुमोच्या वतीने लातूर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना अन्नदान करण्यात आले. भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांना जन्मदिनानिमित्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हयाचे पालकमंत्री गिरीश महाजन, भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे, खा. धनंजय महाडीक, माजी पालकमंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर, खा. सुधाकर शृंगारे, आ. नितेश राणे, आ. अभिमन्यू पवार, माजी आमदार सुरजितसिंह ठाकुर, भाजपा नेत्या चित्राताई वाघ, माजी मंत्री बबनराव पाचपुते, आ. प्रसाद लाड, आ. राम सातपुते, आ. रणजिसिंह मोहिते पाटील, अरविंद पाटील निलंगेकर, आ. संतोष दानवे, आ. सुभाष देशमुख, आ. माधुरी मिसाळ, भाजपाचे दिलीपराव देशमुख यांच्यासह महाराष्ट्रातील अनेकांनी दुरध्वनीवरुन शुभेच्छा दिल्या. अभिष्ठचिंतन कार्यक्रम प्रसंगी तुळशीरामअण्णा कराड, काशिरामनाना कराड, सौ. संजिवनीताई कराड, राजेश कराड, ऋशिकेश कराड, पृथ्वीराज कराड, रणवीर कराड यांच्यासह कराड परिवारातील अनेक सदस्य होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन चंद्रकांत कातळे यांनी केले.

अभिष्ठचिंतन सोहळ्यात आ. रमेशअप्पा कराड यांची भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, माजी खासदार डॉ. सुनिल गायकवाड, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदिप पाटील खंडापूरकर, माजी आमदार शिवराज तोंडचिरकर, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, अमोल पाटील, शैलेश लाहोटी, विजय क्षिरसागर, महिला आघाडीच्या रागीनी यादव, नवनाथ भोसले, त्र्यंबक गुट्टे, रवि सुडे, भागवत सोट, कुलदिप सुर्यवंशी, हनुमंतबापू नागटिळक, पनगेश्वर कारखान्याचे किशनराव भंडारे, व्यंकटराव अनामे, ॲड. अरुण चव्हाण, काकासाहेब चौगुले, अनिल भिसे, अनंत चव्हाण, मुनोज कराड, महेंद्र गोडभरले, प्रदिप मोरे, सुकेश भंडारे, चंद्रभान जाधव, काकासाहेब मोरे, मंगेश पाटील, बस्वराज रोडगे, प्रकाश पाटील, ऋशिकेश बद्दे, अशोक बिराजदार, सतिश आंबेकर, डॉ. बाबासाहेब घुले, ॲड. दशरथ सरवदे, बन्सी भिसे, वसंत करमुडे, वैभव सापसोड, पद्माकर चिंचोलकर, विजय काळे, श्रीकृष्ण पवार, गोविंद नरहरे,



शरद दरेकर, ॲड. अमित रोडे, श्रीकृष्ण जाधव, सुधाकर गवळी, सुधाकर कराड, विजय गंभिरे, अशोक सावंत, पत्रकार शहाजी पवार, अरूण समुद्रे, बालाजी फड, रामेश्वर बहर, संगम कोटलवार, बापुराव चामले, संतोष तुरुप, श्रीकृष्ण मोटेगावकर, संभाजी वायाळ, सिद्धेश्वर मामडगे, राहूल पाटील, महेंद्र जाधवर, बालाजी दुटाळ, प्रताप पाटील, दत्ता सरवदे, विजय चव्हाण, राजकिरण साठे, उमेश बेद्रे, आदीनाथ मुळे, बाबा भिसे, सुरज शिंदे, गंगासिंह कदम, माऊली भिसे, सुरेखा पुरी, ललिता कांबळे, अनुसया फड, लता भोसले, उषा शिंदे, जणाबाई साखरे, उषा रोडगे, शीला आचार्य, श्रीमंत नगारगोजे, अरविंद सुरकुटे, संजय डोंगरे, जगदिश कुलकर्णी, शामसुंदर वाघमारे, अनंत कणसे, विश्वास कावळे, अनंत कोरे, कुलदिप ठाकुर, भैरवनाथ पिसाळ, ॲड. धनराज शिंदे, समाधान कदम, काशिनाथ ढगे, लक्ष्मण नागीमे, वाजीद पटेल, अनवर पटेल, किरण मुंडे, शिवासिंह सिसोदिया, मारोती गालफाडे, शिवमुर्ती उरगुंडे, राजकुमार आलापुरे, किशन क्षिरसागर, अहेमद शेख, अमर चव्हाण, ईश्वर बुलबुले, संजय ठाकूर, बंडु केंद्रे, विशाल कणसे, रमाकांत फुलारी, फुलचंद अंधारे, धनंजय बिक्कड, धनंजय पवार, हरीकृष्ण गुरले, सचिन इगे, श्रुती सवई, योगेश पुदाले, बालाजी पटाडे, रमेश चव्हाण, रशिद पठाण, बालाजी शिंदे, भाऊसाहेब गुळभिले, माधव घुले, सुंदर घुले, जगदीश माळी, वैजनाथ हराळे, विपुल चेपट, अनत सरवदे, संतोष चव्हाण, गोपाळ शेंडगे, चंद्रकांत वांगसकर, धनंजय जाधव, अभिनव वायबसे, विनायक मगर, शंकर चव्हाण, हणमंत गव्हाणे, विजय मलवाडे, सुरेश पाटील, पांडुरंग शिंदे, बालासाहेब कदम, राम बंडापल्ले, गोपाळ पाटील, किशोर काटे, अच्युत कातळे, उत्तम चव्हाण, संतोष राठोड, सुभाष राठोड, अप्पासाहेब पाटील, रामराव कराड, दिलीप चव्हाण, योगेश राठोड, दत्ता अंबेकर, पंकज काळे, सचिन साबदे, नवनाथ माने, पांडूरंग बालवाड, बालाजी गवळी, किरण रोंगे, ज्ञानेश्वर जूगल, पुंडलिक बेंबडे, लक्ष्मण खलंग्रे, दिलीप पाटील, ॲड. पांडूरंग आदुडे, उज्वल कांबळे, नंदकुमार मोटेगावकर, यांच्यासह लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, व्यापारी, डॉक्टर्स, प्राध्यापक, सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह लातूर एमआयटीचे अधिष्ठाता डॉ. एन.पी. जमादार, शैक्षणिक संचालक डॉ. चंद्रकांत शिरोळे, उपअधिष्ठाता डॉ. बस्वराज नागोबा, रुग्णालय अधिक्षक डॉ. एकनाथ माले, प्राचार्य सरवनन सर, प्राचार्य होगाडे, डॉ. बबन आडगावकर, डॉ. अरूणकुमार राव, डॉ. महेंद्र बिक्कड, डॉ. सचिन भावठाणकर, डॉ. बस्वराज वारद, डॉ. चंद्रकला पाटील, डॉ. प्रदिप केंद्रे, डॉ. विद्या कांदे, डॉ. मुकुंद भिसे, डॉ. सुनिल सगरे, डॉ. सुरेश कांगणे, डॉ. यतिशकुमार जोशी, डॉ. अमोल डोईफोडे, सचिन मुंडे, मधुकर गुट्टे, श्रीपती मुंडे व इतर अधिकारी व कर्मचारी आदी अनेकांनी आ. रमेशअप्पा कराड यांना प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या.

## मतमोजणी कक्षातील पूर्वतयारीची जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांनी केली पाहणी

मतमोजणी कक्षात मोबाईल घेवून येण्यास मनाई

मतमोजणी कक्षात भारत निवडणूक आयोगाने परवानगी दिलेल्या व्यक्तींशिवाय इतर कोणालाही मोबाईल घेवून प्रवेश करण्यास मनाई आहे. त्यामुळे उमेदवार, उमेदवारांचे प्रतिनिधी, मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना मतमोजणी कक्षात मोबाईल घेवून जाता येणार नाही. त्यामुळे प्रवेशद्वारावरच तपासणी करून सर्वांना मतमोजणी कक्ष परिसरात प्रवेश देण्यात येणार आहे.



लातूर : – लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया मंगळवारी (दि. ४) बार्शी रोडवरील शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन येथे होणार आहे. या मतमोजणीसाठी करण्यात येत असलेल्या पूर्वतयारीचा जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी आढावा घेतला. तसेच मतमोजणी कक्षाची पाहणी करून अनुषंगिक सूचना दिल्या. अपर जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपजिल्हाधिकारी संगीता टकले, प्रियांका आयरे, नितीन वाघमारे, उपविभागीय अधिकारी रोहिणी न्हे–विरोळे, शरद झाडके, सुशांत शिंदे, मंजुषा लटपटे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. मतमोजणीसाठी सहा विधानसभा क्षेत्रनिहाय स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक कक्षात १४ टेबलवर मतदान यंत्रातील (ईव्हीएम) मतमोजणीची प्रक्रिया होणार आहे. तसेच टपाली मतमोजणीसाठी स्वतंत्र व्यवस्था असणार आहे. या अनुषंगाने करण्यात आलेल्या तयारीचा जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी आढावा घेतला. यावेळी संबंधित विधानसभा क्षेत्रासाठी नियुक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतमोजणी दिवशी अवलंबिण्यात येणाऱ्या कार्यपद्धतीची माहिती दिली. मतमोजणी कक्ष परिसरातील सुरक्षा व्यवस्था, प्रवेशद्वारावरील तपासणी, मतमोजणीच्या प्रत्येक फेरीनिहाय आकडेवारीचे संकलन, टपाली मतमोजणी आदी बाबींचाही यावेळी आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे, पोलीस अधीक्षक श्री. मुंडे यांनी मतमोजणी कक्षाची आणि परिसराची पाहणी केली. तसेच मतमोजणी दिवशीच्या पोलीस बंदोबस्ताबाबत आढावा घेतला.

## भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई च्या वतीने युवक श्रामणेर शिबीराचे शानदार उदघाटन





नवी मुंबई / के. एच. हनवते :– दिनांक :– २८/०५/२०२४ रोजी नवी मुंबई जिल्हाअंतर्गत भारतीय बौद्ध महासभा युवक श्रामणेर शिबीर उद्घाटन सोहळा सूर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर भवन, पंचशील बुद्ध विहार, तूर्भा स्टोअर, तुर्भे (पूर्व) नवी मुंबई येथे भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हा शाखेच्या विद्यमाने आयोजित युवक श्रामनेर शिबिराचे उद्घाटन बुधवार दि. २९. ०५. २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता प्रारंभ झाला. आयु. जयवंत लव्हांडे गुरुजी (अध्यक्ष नवी मुंबई जिल्हा),प्रवज्ञा विधी :– पुज्य भंते विशुद्धी बोध्दी, चैत्यभुमी यांचे उपस्थित सुरुवात झाली. या कार्यक्रमास केंद्राचे सर्व पदाधिकारी, मुंबई प्रदेश शाखेचे सर्व पदाधिकारी, महाराष्ट्र राज्य शाखेचे सर्व पदाधिकारी, समता सैनिक दलाचे सर्व अधिकारी व सैनिक, तसेच नवी मुंबई अंतर्गत असलेल्या सर्व शहर शाखांचे व वार्ड शाखांचे पदाधिकारी व कार्यकर्ते, बौद्धाचार्य, बौद्धाचार्या, केंद्रीय शिक्षक / शिक्षिका तसेच महाराष्ट्र राज्यातील ठाणे, पालघर व रायगड जिल्हा शाखांचे पदाधिकारी या सर्वांना नम्र विनंती करीत आहोत कि, नवी मुंबई येथे विविध जिल्ह्यातुन येणारे शिबीरार्थी श्रामनेरांना चीवर दान करण्यासाठी, आपण सर्वांनी वेळेवर उपस्थित राहुन सहकार्य करावे. आसे अव्हाण करण्यात आले होते त्याला सर्वांनी भरपूर प्रतीसाद दिला.आपले धम्म सेवक, जयवंत लव्हांडे (जिल्हाध्यक्ष नवी मुंबई.), जीवन के. वाडते. (सरचिटणीस नवी मुंबई.), प्रकाश धों. माने. (कोषाध्यक्ष नवी मुंबई), चंद्रकांत बयाजी माने (उपाध्यक्ष संस्कार विभाग नवी मुंबई), नवी मुंबई जिल्हा कार्यकारणी शिबिराची संपूर्ण व्यवस्था नवी मुंबई जिल्हा समता सैनिक दल बटालियन पाहात आहेत.

## देशात इंडिया आघाडीची त्सुनामी

वाराणसी : एक जून रोजी होणा–या लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींचा मतदारसंघ असलेल्या वाराणसीमध्येही मतदान होणार आहे. नरेंद्र मोदी यांना सलग तिस–यांदा वाराणसीमधून प्रचंड मताधिक्याने विजयी करण्यासाठी भाजपाच्या कार्यकर्त्यांनी कंबर कसली आहे. तर दुसरीकडे इंडिया आघाडीच्या वतीने काँग्रेसचे नेते अजय राय यांनी मोदींसमोर आव्हान उभे केले आहे. यावेळी वाराणसीमध्ये इंडिया आघाडीने अजय राय यांच्यामागे आपली सर्व ताकद एकवटली आहे. त्यामुळे मोदींना या निवडणुकीत कडवे आव्हान मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान, देशभरात इंडिया आघाडीची त्सुनामी असून, वाराणसीमध्ये नरेंद्र मोदी यांचा पराभव होईल, असा दावा मोदींविरोधात निवडणूक लढवत असलेले काँग्रेसचे उमेदवार अजय राय यांनी केला आहे. एका मुलाखतीमध्ये वाराणसीमधील निवडणुकीबाबत अजय राय म्हणाले की, निवडणुकीच्या स्थितीबाबत इतरांपेक्षा मी अधिक चांगल्या पद्धतीने समजू शकतो. निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यासोबत विरोधी पक्ष अधिकाधिक भक्कम होत चालला आहे. पहिल्या टप्प्यातील



मतदानाने भाजपाला एक कठोर संदेश दिला आहे. अटलबिहारी वाजपेयी यांच्या पक्षाच्या कॅडर प्रणालीचा सन्मान केला जात असे. मात्र आता असे होत नाही असे अजय राय म्हणाले. मागच्या दोन निवडणुकांमध्ये नरेंद्र मोदींकडून दारुण पराभव झालेल्या अजय राय यांनी आता लोक समजूतदार झाले असून यावेळी नक्की बदल घडवतील, असा विश्वास व्यक्त केला आहे. जनता भाजपाची आश्वासने ऐकून थकली आहे. तसेच बदल घडवण्याची संधी शोधत आहे. मागच्या वेळी नरेंद्र मोदी हे वाराणसीमध्ये एक रात्रही थांबले नव्हते. मात्र यावेळी ते १३ आणि २१ मे रोजी दोन रात्री येथे थांबले होते, असेही अजय राय यांनी सांगितले. दरम्यान, लोकसभा निवडणुकीमध्ये इंडिया आघाडीची त्सुनामी सुरू असून, त्यात भाजपा कुठे जाईल ते कळणारही नाही. वाराणसीमध्ये विकास दिसत नाही आहे. सर्वसामान्य लोक त्रस्त आहेत. मोदी गंगामातेचे पुत्र बनून आले होते. मात्र अजूनही गंगा प्रदूषित होत आहे. शहरातील नाल्यांचे पाणी गंगेत सोडले जात आहे. काशीला प्रयोगशाळा बनवले काशीला प्रयोगशाळा बनवून ठेवले आहे. रोज नवनव्या प्रयोगांमुळे लोक त्रस्त आहेत. तसेच यावेळी वाराणसीमध्ये गुजराती भगाओ अभियान सुरू आहे. तसेच आता जनता मोदींना निरोप देईल, असा दावा अजय राय यांनी केला. पूर्वी भाजपामध्ये असलेले अजय राय हे तीन वेळा आमदार म्हणून निवडून आले होते.

## पाटण्यात उष्माघाताने ८० मुले बेशुद्ध

नवी दिल्ली; वृत्तसंस्था : वैशाख वणवा दिल्लीत अक्षरश: पेटलेला आहे. दिल्लीच्या तापमानाने १०० वर्षांतील विक्रम मोडीत काढले आहेत. बुधवारी दिल्लीतील मंगेशपूर परिसरात दुपारचे तापमान ५२.३ अंशांवर धडकले होते. राजस्थान, उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणासह बिहारमध्येही उष्णतेची लाट कायम आहे. बिहारमधील पाटण्यात बुधवारी दुपारी उष्माघातामुळे वेगवेगळ्या घटनांत मिळून ८० शालेय विद्यार्थी बेशुद्ध पडल्याने एकच खळबळ उडाली! बिहारमधील अनेक जिल्ह्यांमध्ये पारा बुधवारी ४८ अंशांच्या जवळपास पोहोचला. आठ जिल्ह्यांतील ८० मुले कडक उन्हामुळे भोवळ येऊन पडली. भर रस्त्यावर, ऑटो रिक्षांमध्ये तसेच अनेक शाळांमध्येही अशा घटना घडल्या. मुलांना तातडीने रुग्णालयांत दाखल करण्यात आले. राज्यात गुरुवारपर्यंत उष्णतेची लाट कायम राहणार आहे. राजधानी दिल्लीत तर तापमानाने कहर केला. दुपारपर्यंत उन्हाचा तडाखा अस असाच होता. घराबाहेर पडायलाही कुणी धजत नव्हते. पारा ५२ अंशांच्या पुढे सरकल्यानंतर काही वेळाने काही ठिकाणी झालेल्या पावसाने काहीसा दिलासा मिळाला. दिल्लीनंतर चुरू सर्वांत उष्ण शहर दिल्लीनंतर राजस्थानातील चुरू हे जिल्ह्याचे शहर देशातील दुसरे सर्वाधिक उष्ण शहर ठरले.

## संपादकीय....

# अमरावतीतील तुघलक!

प्रतिस्पर्धी राजकारण्याचे नाक कापण्यासाठी उद्योजक, गुंतवणूकदार यांचा सर्रास बळी देणे हे फक्त महाराष्ट्रातच घडते असे नाही, इतर राज्यांतही तीच परिस्थिती आहे स्थानिक राजकारणातील साठमारीमुळे गुंतवणूकदारांचे नुकसान होण्याचा अनुभव भारतात नवा नाही. अलीकडच्या काळातील याचे भव्य उदाहरण म्हणजे एन्रॉन या अमेरिकी कंपनीचा महाराष्ट्रातील प्रकल्प. त्याची मुहूर्तमेढ रोवली गेली नरसिंह राव हे पंतप्रधानपदी असताना. त्यांनी आणलेल्या उदारीकरणाच्या धोरणातून परकीय गुंतवणूक वीज क्षेत्रात खुली झाली आणि पहिला गुंतवणूक प्रस्ताव एन्रॉनकडून

आला. महाराष्ट्रात त्या वेळी मुख्यमंत्रीपदी होते शरद पवार. विरोधी पक्षात असलेला भाजप, त्यातही त्या पक्षाचे नेते हे पवार यांच्या उच्चाटनासाठी उतावीळ होते. त्यांनी या प्रकल्पाचा बहाणा करून पवार यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप केला आणि आपण सत्तेवर आल्यास हा प्रकल्प अरबी समुद्रात बुडवण्याची वल्गना केली. त्यांना सत्ता मिळाली. प्रकल्प बुडवला गेला. पण लगेच पुन्हा वर काढावा लागला. दरम्यान गुंतवणूकदार कंपनीचे जे नुकसान व्हायचे ते झाले.

एन्रॉन काही पुन्हा उभा राहिला नाही. अशा वादांचे ताजे उदाहरण म्हणजे नाणार येथील तेल शुद्धीकरण प्रकल्प. मुख्यमंत्रीपदी असताना देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पासाठी बरेच प्रयत्न केले. पण सत्तेतील साथीदार असलेल्या शिवसेनेने त्यास मोडता घातला. शिवसेनेचा तो विरोध मोडून काढणे राजकीय कारणांमुळे फडणवीस आणि भाजप यांस जमले नाही. पुढे शिवसेनेनेही भाजपची साथ सोडली आणि तो प्रकल्पही रेंगाळला तो रेंगाळलाच. हे फक्त महाराष्ट्रातच होते असे नाही. सगळीकडे हीच तऱ्हा आहे. प्रतिस्पर्धी राजकारण्याचे नाक कापण्यासाठी आपण उद्योजक, गुंतवणूकदार यांचा सर्रास बळी देतो. शेजारील आंध्र प्रदेशातील नागरिकांस तूर्त याचा प्रत्यय येत असेल. त्या राज्यात लोकसभेसमवेत विधानसभा निवडणुकाही झाल्या. नवे सरकार ४ जूनला सत्तेवर येईल. पण त्या राज्यास राजधानी नसेल. त्यानिमित्ताने तेथे सुरू असलेली स्थानिक राजकीय साठमारी समजून घेणे आवश्यक.

तिचे मूळ तेलंगणा या स्वतंत्र राज्याच्या निर्मितीच्या मागणीत आहे. स्थानिक राजकीय पक्षाचे प्रमुख के. चंद्रशेखर राव यांनी हा मुद्दा लावून धरला. त्यासाठी त्यांनी उपोषणही केले. त्या आंदोलनात राव यांना स्वतंत्र राज्याच्या निर्मितीचे आश्वासन दिले गेले. अखंड आंध्र प्रदेश या राज्याच्या पोटातून नवे तेलंगण राज्य कोरून काढले गेले. जून २०१४ मध्ये या राज्याची निर्मिती करताना पुढील दहा वर्षे हैदराबाद ही अखंड आंध्र प्रदेशची राजधानीच नव्या तेलंगणाचीही राजधानी असेल असे निश्चित केले गेले. एक शहर दोन राज्यांची राजधानी असणे आपणास नवे नाही. चंडीगड हे त्याचे उदाहरण. पंजाब आणि हरयाणा या दोन्ही राज्यांची राजधानी हेच शहर आहे. म्हणजे त्या अर्थाने हैदराबाद उभय राज्यांची राजधानी असू शकली असती. पण त्या वेळी ही १० वर्षांची मर्यादा घातली गेली. याचे कारण तेलंगणाच्या मनात हैदराबाद या शहरावरील असलेली मालकी हक्काची भावना. नवे राज्य झाले तरी राजधानी हैदराबादवर आपलाच हक्क राहील याची हमी तेलंगणास देण्यात आली होती. त्या कराराचा अर्थ असा होता की नव्या राज्यास, म्हणजे उर्वरित आंध्र प्रदेशास, आपली नवी राजधानी पुढील दहा वर्षांत वसवावी लागेल. ही दहा वर्षांची मुदत पुढील आठवड्यात २ जून या दिवशी संपते. पण पंचाईत अशी की या काळात आंध्र राज्याची नवी राजधानी जन्मालाच आलेली नाही. म्हणजे २ जून रोजी हे तरुण राज्य राजधानीशिवायचे राज्य असेल. यामागे आहे त्या राज्यातील राजकारण. आपणास स्वतंत्र राज्य मिळणार हे निश्चित होण्याआधीही असे काही होणार असल्याचे दिसत होतेच. त्याच अनुषंगाने अखंड आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री तेलगु देसमचे चंद्राबाबू नायडू यांनी नव्या संभाव्य राज्यासाठी राजधानीचा शोध त्या वेळी सुरू केला होता. गुंटूर जिल्ह्यात कृष्णा नदीकाठी असलेले स्थळ नव्या राजधानीसाठी मुक्रर केले गेले.

अमरावती हे त्याचे नाव. एव्हाना चंद्राबाबू नायडू किती आधुनिक, तंत्रप्रेमी वगैरे अशी त्यांची प्रतिमा झालेली होती. केंद्रात यांचे सरकार असताना नायडू यांचा रथ जमिनीपासून बोटभर वरूनच चालत असे. त्यामुळे त्यांनी आपल्या शैलीने या नव्या राजधानी निर्मितीचा घाट घातला. त्यासाठी सिंगापूर सरकारला कोट्यवधींचे कंत्राट दिले गेले. ही नवी राजधानी हे देशातील अत्याधुनिक शहर असणार होते. ही पुढे २०१४ साली शंभर स्मार्ट शहरांची भूमका उठण्याआधीची गोष्ट. त्या वेळी ही जणू इंद्रनगरीच असेल असे तिचे स्वप्न रंगवले गेले. अत्यंत आखीव-रेखीव, भविष्याचा विचार करून,इंटरनेटनादी गरजांचा विचार करून हे शहर उभारले जाणार होते. त्यासाठी प्रचंड प्रमाणावर आसपासच्या शेतकऱ्यांच्या जमिनी हस्तगत केल्या गेल्या आणि प्रत्यक्ष शहर उभारणीही सुरू झाली. तथापि आगामी निवडणुकांत चंद्राबाबू हे राजकीय ‘होयडू’चे ‘नायडू’ झाले. त्यांचा दणदणीत पराभव झाला. सत्तेवर आले वायएसआर काँग्रेसचे तरुण जगनमोहन रेड्डी. मोठ्या राजकीय संघर्षातून त्यांना हे यश मिळाले. ते त्यांनी साजरे केले ते पदग्रहण केल्या केल्या अमरावती उभारणीचा निर्णय रद्द करून! आपल्या राजकीय परंपरेप्रमाणे अमरावती निर्मितीत अत्यंत मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप त्यांनी केला आणि चंद्राबाबू यांच्यावर त्याचा ठपका ठेवला. आपल्याकडे भ्रष्टाचाराचे आरोप म्हणजेच प्रत्यक्ष भ्रष्टाचार असे मानण्याची पद्धत असल्याने ना ते कधी सिद्ध करावे लागतात ना कोणास प्रत्यक्ष त्यासाठी शिक्षा होते. आंध्रातही तेच झाले. पण मधल्या मध्ये सिंगापूर सरकारशी या नव्या शहराच्या निर्मितीसाठी झालेला करार लटकला. सिंगापूर सरकारने विविध पातळीवर यावर मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. पण भ्रष्टाचाराचा मुद्दा, म्हणजे आरोप, असल्याने काहीही घडले नाही. हे शहर निर्मितीचे कंत्राट सिंगापूरने गमावले.पण म्हणून नवे कोरे मुख्यमंत्री जगनमोहन यांस नवी राजधानी वसवता आली; असेही नाही. अमरावती उभी राहिली नाही ती नाहीच. पण मग ‘एकापेक्षा तीन बऱ्या’ असे वाटून या नव्या मुख्यमंत्र्याने तीन शहरांस राजधानीचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला. अमरावती ही विधिमंडळ राजधानी, विशाखापट्टण ही प्रशासकीय राजधानी तर कर्नुल ही न्यायपालिका राजधानी अशी ही विभागणी झाली. हा असा काही आचरट प्रयोग स्थानिक विधानसभेतही मंजूर झाला. बहुमतधारी मुख्यमंत्र्याचा तो निर्णय. त्यास विरोध कोण करणार? त्यामुळे विधानसभेत अशा राजधानीच्या त्रिस्थळी यात्रेस मंजुरी मिळाली. पण प्रकरण विधान परिषदेत लटकले. कारण त्या सदनात वायएसआर काँग्रेसला बहुमत नाही. तिथे विरोधकांनी डाव साधला आणि मुख्यमंत्र्यांचा निर्णय रखडेल अशी व्यवस्था केली. नंतर तर हे असे तीन तीन राजधान्या वसवण्याचे प्रकरण न्यायालयातच गेले. ते अजूनही तिथेच आहे. न्यायप्रविष्ट.

# पशुपक्ष्यांसाठी रुग्णोपचारांची व्यवस्थाकर्ती महाराणी!

अहिल्याबाईंनी जनावरांसाठी डोण्या बांधून घेतल्या. पशुपक्ष्यांसाठी रुग्णोपचारांची व्यवस्था केली. सर्पदंशावर लगोलग उपचार व्हावेत म्हणून हकीम-वैद्य नेमले. स्त्रियांना सुरक्षित स्नानासाठी, कपडे बदलण्यासाठी बंदिस्त ओवऱ्या ठेवल्या. मुंग्यांना साखर आणि जलचरांना कणकेच्या गोळ्या खाऊ घालण्यापर्यंत त्यांचा दानधर्म सढळ होता. असा हा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा प्रेरणादायी संकलित माहितीचा लेख वाचकांना समर्पित... संपादक.

गोरगरिबांना सणासुदीला त्या अन्नदान करीत, कपडे वाटत, थंडीच्या दिवसात घोंगड्या वाटल्या जात. त्यांनी प्रमुख तीर्थक्षेत्री विशेषतः अयोध्या, नाशिक, द्वारका, पुष्कर, हृषीकेश, जेजुरी, पंढरपूर, गया, उदेपूर, चौंढी येथे मंदिरे बांधली. यांशिवाय सोरटी सोमनाथ, ओंकारेश्वर, मल्लिकार्जुन, औंढानागनाथ, काशीविश्वेश्वर, विष्णुपाद, महाकाळेश्वर आदी मंदिरांचा जीर्णोद्धार केला. वाराणसी, प्रयाग, पुणतांबे, चौंढी, नाशिक, जांब- इंदूर, त्र्यंबकेश्वर येथे नदीला विस्तीर्ण घाट बांधले आणि गोकर्ण महाबळेश्वर, उज्ज्ञयिनी, रामेश्वर, भीमाशंकर आदी ठिकाणी अन्नछत्रे उघडली. सप्तपुरे- चार धामेया ठिकाणी घाट, बाग, मंदिरे, कुंडे, धर्मशाळा बांधून यात्रिकांची सोय केली. शिवाय त्यांनी जेजुरी येथे श्री मल्हारी गौतमेश्वराची छत्री, इंदूरला मालेराव व गौतमीबाई यांच्या छत्र्या आणि महेश्वरला मुक्ताबाईंच्या स्मरणार्थ नाजूक कारागिरी केलेले मंदिर बांधले व कुंभेरीजवळ खंडेरावांच्या स्मरणार्थ छत्री बांधली.



मध्यम उंचीची, सावळ्या वर्णाची, डोईवर पदर घेतलेली ही स्त्रीकर्तृत्व आणि विचार या दोन्ही दृष्टींनी केवढ्या उंचीची होती, हे त्यांचे आयुष्यच सांगते. एक अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्याला त्यांची धर्मपरायण आणि उदारवृत्ती कारणीभूत ठरली. बाई काय राज्य कारभार करणार? ही दरबारी मंडळींची अटकळ त्यांनी सपशेल खोटी ठरविली. अशी शंका घेणाऱ्यात त्यांचा जुना दिवाण गंगाधर यशवंत चंद्रचूड उर्फ गंगोबा तात्या हा प्रमुख होता. राघोबा दादांशी त्यांनी अहिल्याबाईंविरुद्ध संधान बांधले आणि इंदूर बळकावण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले होते. अहिल्याबाईंना कळले, तेव्हा त्या युद्धास तयार असल्याचे त्यांनी राघोबा दादास कळविले. राघोबांना ते अडचणीचे झाले. हरलो तर बाईकडून हरलो आणि जिंकलो तरी बाईशी युद्ध करण्यात कोणती मोठी मर्दुमकी? शेवटी राघोबांना माघार घ्यावी लागली. त्यांचा उत्तम पाहुणचार अहिल्याबाईंनी इंदुरात केला. अशा रीतीने बाईंच्या लौकिकात आणखीच भर पडली.

अहिल्याबाईंचा जन्म जिल्हा बीड येथील चौंडी या छोट्याशा गावात दि.३१ मे १७२५ रोजी माणकोजी शिंदे व सुशिलाबाई या दांपत्याच्या पोटी झाला. धनगर समाजात जन्मलेल्या अहिल्याबाईंचे लग्न वयाच्या आठव्या वर्षी सुभेदार मल्हारराव होळकर यांचा मुलगा खंडेराव यांचेशी झाले. खंडेरावांच्या आईचे नाव गौतमीबाई होते. ते व्यसनी, छंदीफंदी होते. पण अहिल्याबाईंनी याबाबतीत तक्रार न करता सासऱ्यांनी नेमून दिलेल्या कामात लक्ष घातले. कुशाग्र बुद्धीची देणगी लाभलेल्या या सूनबाईंवर सासऱ्यांचा मोठा विश्वास होता. खुप महत्त्वाचा पत्रव्यवहार ते अहिल्याबाईंवरच सोपवीत असत. खंडेरावांपासून त्यांना दोन अपत्ये झाली. ती मालेराव हा मुलगा आणि मुक्ताबाई ही कन्या ही होत. अहिल्याबाईंना वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी वैधव्याला सामोरे जावे लागले. पती खंडेराव कुंभेरी येथे लढाईत मरण पावले. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे त्या सती जायला निघाल्या. पण सासरे म्हणाले- प्रजाहितासाठी तरी तुम्ही सती जाऊ नये. हे राज्य सांभाळायचे आहे. आपल्या सासऱ्यांच्या इच्छेचा त्यांनी मान राखला. त्यांनी सती न जाता राज्यकारभारावर आपले लक्ष केंद्रित केले. मल्हारराव ज्यावेळी मोहिमेवर असत, तेव्हा स्वतः अहिल्याबाई राज्याचा बंदोबस्त चोख राखीत असत. मल्हाररावांच्या सल्ल्यानुसार वागत असत. मल्हारराव होळकरांना पेशव्यांनी इंदूर संस्थानची जहागीर दिली होती. दौलतीचा कारभार मोठा होता. पण सन १७६६मध्ये त्यांचे निधन झाले. अहिल्याबाईंवर फार मोठी जबाबदारी येऊन पडली. त्यांचा पुत्र मालेराव यांना जरी सुभेदारीची वस्त्रे मिळाली, तरी ती सांभाळण्याची त्यांच्यात कुवत नव्हती. लवकरच त्यांचे देहावसान झाले. अहिल्याबाई आता खऱ्या अर्थाने राज्यकर्ती झाल्या. पुढील अठ्ठावीस वर्षे त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालविला. तिजोरीत भर घालत त्यांनी प्रजाहिताकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले.

अहिल्याबाईंच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय घटना त्यांचा लौकीक वाढविणारी आहे. आपली कन्या मुक्ताबाई हिचे स्वयंवर घोषित करताना त्यांनी जाहीर केले की, जो कोणी चोर, लुटारु, दरोडेखोर यांचा राज्यात बंदोबस्त करील, त्या शूर व्यक्तीशी मुक्ताबाईचा विवाह लाविला जाईल. त्यावेळी जातपात बघितली जाणार नाही. हा अलौलिक विचार जाहीर करून त्या थांबल्या नाहीत, तर त्यांनी कृतीही तशीच केली. यशवंतराव फणसे या गुणी, शूर तरुणाशी त्यांनी मुलीचा विवाह करून दिला. त्या एक चाणाक्ष आणि सुधारणावादी राज्यकर्ती होत्या. पूर्वीच्या कायद्यांमध्ये त्यांनी परिस्थितीनुसार काही सुधारणा केल्या. करपद्धती सौम्य केली; मात्र शेतकऱ्यांकडून सारा घेणे चालू ठेवले. पाटील कुळकर्ण्यांच्या वतन हक्कांचे संरक्षण करून गावोगावी न्याय देणारे पंच अधिकारी नेमले. त्यावेळी डोंगर मुलखातून भिल्ल व गोंड आदिवासी प्रवाशांना उपद्रव देत आणि त्यांच्याकडून भीलकवडी नावाचा कर वसूल करीत. तेव्हा बाईंनी त्यांच्याशी संवाद साधून त्यांचा कर घेण्याचा हक्क मान्य केला. त्यांच्याकडून पडिक जमिनींची लागवड करून घेतली. शिवाय त्यांना विशिष्ट हद्द नेमून दिली. जमीन करार- पट्ट्याने देण्याची पद्धत सुरू केली.

अहिल्यादेवींनी सन १७७२ साली राजधानी इंदूरहून नर्मदातीरी महेश्वरला हलविली. तिथे अनेक वास्तू बांधल्या. राजवाड्यात प्रशस्त देवघर होते. नदीला घाट बांधले. मंदिरांचा जीर्णोद्धार केला व पूर्वजांच्या स्मरणार्थ छत्र्या बांधल्या. महेश्वर हे विणकरांचे मध्यवर्ती केंद्र होते. त्यांनी वस्त्रोद्योगास उत्तेजन दिले. कोष्ट्यांची वसाहत स्थापन केली आणि उत्तम हातमागाची सणंगे तयार होतील, अशी पेठ कायम केली. त्यांचा मूळ स्वभाव सौम्य असला, तरी राज्यकारभारात त्यांनी मनरूपसिंगसारख्या कुविख्यात डाकूला फाशी दिली. त्यांच्या टांकसाळीतील नाण्यांवर बिल्वपत्र व शिवलिंग यांचे छाप असत. त्यांच्या धर्मपरायणतेला प्रांत मर्यादा नव्हती. त्यामुळे त्यांचे नाव आसेतू हिमाचल घेतले जाते. त्यांनी अन्नछत्रे उघडली, राज्यातून विहिरी खोदून त्या चिरेबंद बांधून दिल्या. उन्हाळ्यात राज्यातून प्रवास करणाऱ्यांसाठी पाणपोया, धर्मशाळा, पांथशाळा, आश्रयशाळा आदी बांधल्या.

अहिल्याबाईंचा ग्रंथसंग्रह मोठा व दुर्मिळ होता. त्यात निर्णयसिंधू, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा माहात्म्य, मुहूर्त चिंतामणी, वाल्मिकी रामायण, पद्मपुराण, श्रावणमास माहात्म्य इत्यादी ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती होत्या. विद्वानांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे मानसन्मान दिला जाई. मोरापंत व शाहीर अनंत फंदी यांचा अहिल्याबाईंनी आदर-सत्कार करून अनंत फंदीस सल्लाही दिला आणि तमासगिरीपासून परावृत्त केले. अखेरच्या दिवसांत त्यांना दुःख आणि संघर्षाला तोंड द्यावे लागले. त्यांचे दोन भाऊ वारले. मुलीचा मुलगा नाथ्याबा ऐन तारुण्यात गेला, तुकोजी होळकरांची सून आनंदीबाईचे देहावसान झाले. त्यानंतर जावई यशवंतराव फणसे अचानक गेले आणि मुक्ताबाई सती गेली. अशा बिकट परिस्थितीत शिंद्यांचा सरदार गोपाळराव याने सन १७९२मध्ये होळकरांच्या फौजेवर हल्ला केला. तेव्हा तरुणासही लाजवील, अशा तडफदारीने त्यांनी शिंद्यांचा पराभव केला. त्यांच्या राज्यात सुबत्ता, संपन्नता व शांती होती. त्या अजातशत्रू होत्या; पण राज्यावर गुदरलेल्या संकटांना त्यांनी चोख उत्तर दिले. दि.१३ ऑगस्ट १७९५ रोजी महेश्वर येथे वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. !! जयंती पर्वावर त्यांच्या कर्तबगारीला व महिलाशक्तीला मानाचा लवून मुजरा !!

********

- संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.
गडचिरोली, व्हा. नं. ९४२३७१४८८३.


# प्रजाजनासाठी धड़पड़णाऱ्या अहिल्यादेवी

अहिल्यादेवी स्वातँय भारतातील, माळव्याच्या तत्त्वज्ञानी महाराणी म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी नर्मदा तीरी, इंदूरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली राजधानी हलविली. मृत्युपर्यंत त्या तिथेच वास्तव्यात होत्या. मल्हाररावांनी त्यांना आधीच प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केल्यामुळे त्या धाडसी बनल्या होत्या. त्यामुळे त्या लढाईत स्वतः सैन्याचे नेतृत्व करीत होत्या. पुढे त्यांनी तुकोजीराव होळकर यांची सेनापती म्हणून नेमणूक केली.

अहिल्याबाईंचे पती खंडेराव होळकर कुम्हटेच्या लढाईत मृत्यु पावल्यानंतर त्याकाळी सती जाण्याची प्रथा अस्तित्वात होती. परंतु सासरे मल्हारराव होळकर यांनी विरोध केला. साम्राज्याचा कारभार सांभाळावा असे त्यांनी सुचविले. माळवा प्रांताचा कारभार बघत असतांना सासरे मल्हारराव होळकर यांचे देखील दु:खद निधन झाले. १७६५ मध्ये सत्तेसाठी झालेल्या एका लढाई दरम्यान लिहिलेल्या एका पत्रावरून मल्हाररावांचा अहिल्याबाईंच्या कर्तृत्वावर किती विश्वास होता हे दिसून येते. चंबळ पार करून ग्वाल्हेर येथे जावा, तेथे तुम्ही ४-५ दिवस मुक्काम करू शकता. तुम्ही मोठे सैन्य ठेवू शकता व त्यांच्या शस्त्रांसाठी योग्य तजवीज करा.....कूच करतांना, मार्गावर तुम्ही सुरक्षेसाठी चौक्या लावा

पूर्वीच शासक म्हणून तरबेज झाल्यामुळे, मल्हारराव व मुलाच्या मृत्यूनंतर, अहिल्यादेवींनी स्वतःलाच राज्य कारभार पाहू देण्याची अनुज्ञा द्यावी अशी पेशव्यांना विनंती केली. त्यांनी शासन करण्यास माळव्यात अनेकांचा विरोध होता, पण होळकरांचे सैन्य अहिल्याबाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते. अहिल्यादेवी सैनिकी कवायतीत हत्तीच्या हौद्याच्या कोपऱ्यात चार धनुष्य आणि बाणांचे भाते ठेवत असत, असे म्हणतात.

अहिल्यादेवी एक अतिशय योग्य शासक व संघटक होत्या. मध्य भारताच्या इंदूरमधील त्यांचा राज्यकाळ सुमारे तीस वर्षे चालला, तो एक स्वप्नवत काळ होता. या काळात कायद्याचे राज्य होते आणि त्यामुळे त्या काळात जनतेची भरभराट झाली. ज्याप्रमाणे शिवाजी महाराज हे जसे पुरुषांमधले उत्तम राजे होते, तसेच अहिल्यादेवी ही स्त्रियांमधील उत्तम राज्यकर्ती होती. तिच्या चांगल्या बुध्दिचे, चांगुलपणाचे व गुणांचे उदाहरण देता येऊ शकते. अशी अहिल्यादेवी ही एक महान स्त्री होती.



आपल्या असामान्य कर्तृत्वाने अहिल्यादेवींनी रयतेचे मन जिंकले. नाना फडणवीसांसकट अनेक उच्च धुरीण आणि माळव्यातील लोकांनुसार ती एक दिव्य अवतार होती. ती आजतागायतची सर्वांत शुद्ध व उदाहरण देण्याजोगी शासक होती. अलीकडच्या काळातील चरित्रकार अहिल्यादेवींना तत्त्वज्ञानी राणी असे संबोधतात. याचा संदर्भ बहुतेक तत्त्वज्ञानी राजा भोज यांच्याशी असावा. अहिल्यादेवी होळकर ह्या एक खरोखरीच विस्तृत राजकीय दृश्यपटलाच्या एक सूक्ष्म अवलोकनकर्त्या होत्या. १७७२ मध्ये पेशव्यांना लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी ब्रिटिशांबरोबर हातमिळवणी करण्याबाबत एक ताकीद दिली होती. त्यांना कवटाळणे हे अस्वलास कवटाळण्याजोगे असल्याचे त्यांनी नोंदले आहे. वाघासारखे इतर प्राणी हे शक्ती व युक्तीने मारले जाऊ शकतात, परंतु अस्वल मारणे हे फारच कठीण असते. सरळ त्याच्या चेहऱ्यावर वार केल्यावरच ते मरते. एकदा त्याच्या मजबूत पकडीत सापडल्यावर ते त्याच्या शिकारीस, गुदगुल्या करून ठार मारते, असाच इंग्रजांचा मार्ग आहे. हे बघता, त्यांच्यावर मात करणे कठीण आहे.

भिल्ल व गोंड या राज्याच्या सीमेवर असलेल्या जमातींमधील वाद अहिल्यादेवी सोडवू शकल्या नाहीत. तरीही त्यांनी त्या लोकांना पहाडातील निरुपयोगी जमीन दिली आणि त्यांना, त्या क्षेत्रातून जाणाऱ्या सामानावर थोडा 'कर' घेण्याचा अधिकार दिला. यासाठी रायगंण सुभ्यावर नवापुर या ठिकाणी ठिंगळे भिल्ल सरदार यांना नेमले. त्यामुळे भिल्ल जमाती होळकराच्या सैन्यात आले व त्यांनी सुरते वर वचक बसवला. याही बाबतीत, (आंग्ल लेखक) माल्कम यांच्यानुसार, अहिल्यादेवींनी त्यांच्या सवयींवर लक्ष ठेवले.

एकोणीसाव्या व विसाव्या शतकातील भारतीय, इंग्रजी व अमेरिकन इतिहासकार हे मान्य करतात की, अहिल्यादेवी होळकरांस माळवा व महाराष्ट्रात, त्याकाळी व आताही, संताचा सन्मान दिला जातो. इतिहासाच्या कोणाही अभ्यासकास ते मत खोडून काढण्याजोगे आजवर काहीही सापडलेले नाही. राजकारणातील बारकावे व तत्त्व व्यावहारिक नीती नियम व सूत्रे आपल्या देशाची राजकीय, सामाजिक, भौगोलिक स्थिती, रणांगणावरील आखाडे व अडचणी आणि बारकावे समजून घेतले. मल्हारराव यांच्या गैरहजेरीत सर्व कारभार करण्यात त्या पारंगत झाल्या. शेतकरी सुखी तर जग सुखी या संकल्पनेतून शेतकऱ्यांच्या जाचक करातून मुक्त केले. अनेक ठिकाणी तलाव व विहिरी बांधल्या. शेतकऱ्यांना गोपालनाचे महत्त्व पटवून प्रजेला गाई देऊन मोठ्या प्रमाणात गोपालन घडवून आणले.

मातोश्रीची लोककल्याणाची कीर्ती ख्याती ऐकुन अनेक विद्वान लोक त्यांची भेट घेण्यास येत असत आणि नंतर त्या ठिकाणीच राहत असत. अनेक विषयाचे विद्वान, शास्त्री पंडीत, व्याकरणकार, कीर्तनकार, ज्योतिषी, पुजारी, वैद्य, हकीम यांनाही त्या मुद्दाम बोलावून घेऊन त्यांना त्या राजाश्रय देत असत. महेश्वर नगरीत वास्तव करीत होते म्हणूनच महेश्वर नगरी त्याकाळी संस्कृती विद्वान व धर्माचे माहेरघर म्हणून नावारूपाला आली होती . ग्रंथ संपदा- निर्मिती छापखाने नसल्याने त्याकाळी धर्माचे तत्त्वज्ञान जाणून घेण्याकरिता हस्तलिखिते वरच अवलंबून राहावे लागत होते. हस्तलिखिते लिहिणारे मोठ्या प्रमाणात रकमेची मागणी करत असत. ज्याप्रमाणे हिरा व रत्ने पारखणाऱ्या जवाहिऱ्याप्रमाणे त्या विद्येची महत्त्व जाणत असल्याने त्यांच्या मागणीप्रमाणे रक्कम देऊन ग्रंथाची हस्तलिखिते तयार करून विद्वान विद्यार्थ्यांसाठी अनमोल ग्रंथसंपदा निर्माण करून जतन केली. शाळा काढून विद्याप्रसाराचे काम केले.

या काळात सती जाण्याची मोठी रूढी व परंपरा होती. सती गेल्याने पुण्य व न गेल्याने पाप असा समज समाजात रूढ होता. रामायण आणि महाभारत यामध्ये अनेक युद्ध होऊनही कोणी सती गेल्याचा उल्लेख नाहीत असे अनेक दाखले देऊन सती प्रथेला शास्त्राचा आधार नाही हे प्रजेला पटवून दिले. कालांतराने १८२९ साली राजाराम मोहन रॉय यांचा प्रयत्नामुळे सतीची अनिष्ट प्रथा कायद्याने बंद करण्यात आली यावरून अहिल्याबाई होळकर यांच्या दूरदृष्टतेची प्रचीती आपणांस येते. त्याकाळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना व प्रजेची चोर दरोडेखोर व भिल्ल लुटमार करीत असत अशा लुटारू लोकांना ठिंगळे सरदारांमार्फत सैन्यात सामील करून पाळीव पशु व गायी, म्हशी आणि शेत जमीनी दिल्या व त्यांचे मत परिवर्तन केले व ते लोक शेती करू लागले त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटला. भिल्ल लोकांना भिलकवाडी कर घेण्याची परवानगी दिली. एवढे करूनही प्रजेला त्रस्त करणाऱ्या या लोकांना त्यांनी तोफेच्या तोंडी देऊन एक प्रकारचा दरारा नर्माण केला.

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, यवढेच नाही तर त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखलं प्रसिंध्द हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यात द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने ध्वस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच शंकराचे एक देऊळ बांधले. सोमनाथला जाणारे लोकं या देवळालाही भेट देतात. अहिल्याबाईंना प्रजेसाठी कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती. अहिल्याबाई होळकर यांच्या न्यायप्रियतेची ख्याती सर्व दूर पसरली होती. सर्वांना समान न्याय हा त्यांचा बाणा होता. त्यांच्या संस्थानचा सुभेदार तुकोजीराव होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्याला तुरुंगात डांबले. तर अहिल्यादेवीच्या सर्वांना समान न्याय या विचाराने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सुद्धा प्रभावित होते.

पेशव्यांनी परवानगी दिल्यावर, ज्या माणसाने तिला विरोध केला होता, त्यास चाकरीत घेऊन तुकोजीराव होळकर (मल्हाररावांचा दत्तक पुत्र) यास सैन्याचा मुख्य करून, अहिल्यादेवी होळकरांनी पूर्ण दिमाखात माळव्यास प्रयाण केले. अहिल्यादेवींनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही. त्या रोज जनतेचा दरबार भरवीत असत व लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यास नेहमीच उपलब्ध असत. भारतीय संस्कृती कोषात अहिल्यादेवीनी केलेल्या बांधकामांची यादी आहे - काशी, गया, सोमनाथ,अयोध्या, मथुरा, हरिद्वार, कांची, अवंती, द्वारका, बद्रीकेदार, रामेश्वर व जगन्नाथपुरी वगैरे. अहिल्यादेवींस, सावकार, व्यापारी, शेतकरी इत्यादी आर्थिकदृष्ट्या सुदृढ झालेले बघून आनंद होत असे. परंतु त्यांनी त्यांच्यावर आपला अधिकार असल्याचे कधीच जाणवू दिले नाही. त्यांनी सर्व राज्यकारभार हा सुखी व धनाढ्य लोकांकडून नियमांतर्गत मिळालेल्या धनापासून चालविला होता, असे दिसते.

अहिल्यादेवींनी जनतेच्या/रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. त्यांच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याचा मंजुरीस नकार दिला, तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तक विधानाचा कार्यक्रम स्वतः आयोजित करून, रीतसर कपडे व दागिन्यांचा अहेर दिला.

अहिल्यादेवींच्या सन्मानाप्रित्यर्थ व स्मृतिप्रित्यर्थ भारत सरकारने २५ ऑगस्ट १९९६ रोजी एक टपाल तिकिट जारी केले. या अशा शासनकर्तीस मानवंदना म्हणून इंदूरच्या विमानतळाचे नाव देवी अहिल्याबाई विमानतळ असे ठेवण्यात आले आहे. तसेच, इंदूर विद्यापीठास देवी अहिल्या विश्वविद्यालय असे नांव देण्यात आले आहे. इंदूर शहराला सर्व सोयीने उपयुक्त प्रगतिशील असे शहर बनविले. महाराष्ट्रातील सोलापूर विद्यापीठाचे नवीन नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ ठेवण्यात आले आहे. १९९६ मध्ये, इंदुरातील नागरिकांनी त्यांच्या नावाने अहिल्यादेवी स्मृतीस अभिवादन म्हणुन पुरस्कार सुरू केला. तो, दरवर्षी, जनसेवेचे विशेष काम करणाऱ्यास दिला जातो. भारताच्या पंतप्रधानांनी पहिल्या वर्षी तो पुरस्कार महान समाजधुरिण नानाजी देशमुखांना दिला.

अशा सोज्वळ, न्यायप्रिय अहिल्यादेवींना इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी भारताच्या कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गारेट असे म्हटले आहे. थोडक्यात अहिल्याबाई यांची रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गारेट यांच्याशी तुलना केली आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळेस पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर यांचे नांव सर्व प्रथम लिहिले जाईल. ही त्यांच्या चांगुलपणाची पावती म्हणायला हरकत नाही.

या इंदूरमधील शासकांनी, त्यांच्या अखत्यारीत असलेल्या सर्वांस चांगले काम करण्यास प्रोत्साहन दिले. व्यापाऱ्यांनी चांगल्या कपड्यांचे उत्पादन केले, व्यापार वाढला, शेतकरी हे शांततेत व दबावरहित होते. कोणतेही प्रकरण राणीच्या निदर्शनास आले की, ते कडकपणे हाताळले जाई. अहिल्यादेवींना आपल्या प्रजेचा उत्कर्ष आवडत असे. तसेच ती प्रजा राजा हिसकावून घेईल म्हणून आपली संपत्ती उघड करण्यास घाबरत नाही, हे बघणे आवडत असे. दूरदूरपर्यंत, रस्त्यांच्या कडेला, दाट छायादार वृक्ष लावण्यात आले होते, विहिरी केल्या होत्या, पथिकांसाठी विश्रांतीगृहे. गरीब, घर नसलेले व अनाथ या सर्वांना त्यांच्या जरुरीनुसार, सर्व मिळत होते. बऱ्याच काळापासून, भिल्ल लोक पहाडांतून सामानाची ने-आण करत असतांना चोर व दरोडेखोर त्यांची लूटमार करीत असत. अहिल्याबाईंनी भिल्ल लोकांना त्यापासून मुक्ती मिळवून दिली व प्रामाणिकपणे शेती करण्याची संधी त्यांना देऊ केली. सर्व समाजाला अहिल्यादेवी आवडत असत आणि तो त्यांच्या उदंड आयुष्याची प्रार्थना करीत असे.

************

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# आध्यात्मिक सेवा सोबत वैभव सेवा महत्त्वाची डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर



लातूर :- आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये आध्यात्मिक सेवेसोबत दुसऱ्यांना आनंद देणारी वैभव सेवा महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी नुकतेच केले. बियांड व्हीजन फाउंडेशन, नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाइंड, लातूर क्रिकेट असोसिएशन फॉर दि ब्लाइंड ऑफ महाराष्ट्र, ॲड. धनंजय चिताडे आणि एस. एम. आर. मित्र मंडळाच्या आर्थिक सहकार्यातून लातूर, नांदेड, धाराशिव, बीड, मुंबई, पुणे, सोलापूर, धुळे, कोल्हापूर व सातारा जिल्ह्यासह ग्रामीण भागातील दृष्टी दिव्यांग व्यक्तींसाठी सामाजिक आध्यात्मिक सहलीचे आयोजन दि. २९ मे ते ३ जून २०२४ या कालावधीमध्ये करण्यात आले आहे याचा शुभारंभ कार्यक्रम हॉटेल पार्थ येथे आयोजित करण्यात होता यावेळी त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. यावेळी विचारमंचावर नॅबचे अध्यक्ष डॉ. विजयभाऊ राठी, श्रीमती गंगाबाई चिथाडे, प्राचार्य डॉ. संजय गवई, ॲड. धनंजय चिथाडे, सामाजिक कार्यकर्ते कालिदास माने, फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. माधव गोरे, सचिव संदीप चोपडे, उपाध्यक्ष प्रा. सुशील शेळके, कोषाध्यक्ष मीरा चोपडे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की, दिव्यांग बंधू-भगिनींची धार्मिक सहल आयोजन करण्यामध्ये मला सहभागी होता आले याचा मला मनस्वी आनंद आहे. या सहलीच्या माध्यमातून दृष्टीबाधित व दिव्यांगांना देव देवतांचे दर्शन होणार आहे. खरे पाहिले तर आपण मंदिरात गेल्यानंतर स्वतःचे डोळे बंद करून दर्शन घेतो व नामस्मरण करतो परंतु दृष्टीबाधित दिव्यांग म्हणून जीवन जगत असताना सातत्यानेच दररोज डोळे मिटलेलेच असल्यामुळे आपण सतत नामस्मरण करतात व ईश्वर प्राप्ती करता. आपल्या दिव्य चक्षूनी या सर्व बाबीचा अनुभव घेता ही बाब महत्त्वाची असून प्रवासा दरम्यान आपण आमच्या सतत संपर्कात राहावे. तिरुपती येथे आपली दर्शन व निवास व्यवस्था ही माजी गृहमंत्री आपले आदर्श शिवराजजी पाटील चाकूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम पद्धतीने केली असल्याचे सांगून त्यांनी सहलीमध्ये सहभागी झालेल्या दिव्यांग बंधू भगिनींना हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रास्ताविक करताना फाउंडेशनचे अध्यक्ष माधव गोरे म्हणाले की, लातूर येथून निघणारी ही सहल रेल्वे मार्गे सोलापूरहून तिरुपतीला दि. ३० मे रोजी पोहोचणार असून तिथे लॉर्ड वेंकटेश्वरा व इतर देव-देवतांचे दर्शन घेऊन दि. ३१ मे रोजी तिरुपतीहून रेल्वे मार्गाने कोल्हापूरकडे रवाना होणार आहे. दि. ०१ जून २०२४ रोजी कोल्हापूर येथे महालक्ष्मी देवीचे दर्शन घेऊन कोल्हापूर परिसरातील इतर आध्यात्मिक स्थळांसह पर्यटन स्थळास भेट देणार आहे. दि. ३ जून रोजी ही सहल कोल्हापूरहून लातूरकडे प्रस्थान करणार आहे. दृष्टी दिव्यांग व अस्थिव्यंग व्यक्तींसह त्यांच्या परिवारातील १०० व्यक्तींचा या सहलीत सहभाग असणार आहे. दिव्यांग व्यक्तींना आध्यात्मिक अनुभव देणे हा या सहलीमागील हेतू आहे. तिरुपती येथील दर्शन व निवास व्यवस्था तथा कोल्हापूर येथील महालक्ष्मी देवीचे दर्शन व निवास व्यवस्था उपलब्धतेसाठी डॉ. अर्चनाताई पाटील आणि ॲड. विक्रमजी पाटील चाकूरकर यांच्या माध्यमातून देशाचे माजी गृहमंत्री शिवराजजी पाटील चाकूरकर यांच्यास्तरावरून सदर व्यवस्था उपलब्ध करून देण्यात बहुमोल सहकार्य लाभले आहे असेही ते म्हणाले. यावेळी डॉ. विजयभाऊ राठी, प्राचार्य डॉ. संजय गवई, सामाजिक कार्यकर्ते कालिदास माने आणि ॲड. धनंजय चिथाडे यांनीही आपली मनोगत व्यक्त करून सहलीत सहभागी होणाऱ्या दृष्टी दिव्यांग व दिव्यांग व्यक्तींना शुभेच्छा व आर्थिक सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुदर्शन पाटील यांनी केले तर आभार प्रा. सुशील शेळके यांनी मानले. या कार्यक्रमाला ॲड. विक्रमजी पाटील, लातूर बस आगार प्रमुख हनुमंत चपटे, सुनील ओझा, प्रवीण मिटकरी, ज्येष्ठ पत्रकार अरुण समुद्रे, एस.आर. कुलकर्णी, सुभाष चिने, अमोल निलंगेकर यांच्यासह ॲड. धनंजय चिताडे यांचे कौटुंबिक व मित्र परिवाराचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# थकीत करापोटी ०६ गाळ्यांना ठोकले सील एका दिवसात ५ लाख रुपयांची वसुली

लातूर/प्रतिनिधी:- थकित मालमत्ता करापोटी मनपाने वसुली मोहीम तीव्र केली असून गुरुवारी (दि.३०) रोजी ०६ गाळ्यांना सील ठोकण्यात आले. पालिकेने ५ लाख रुपयांचा करही वसूल केला.

मनपाच्या मालकीची शहरात व्यापारी संकुले आहेत.या संकुलातील कांही गाळेधारकांनी मालमत्ता कर थकवला आहे.या गाळेधारकांकडे असणारा कर वसूलकरण्यासाठी पालिकेने ही विशेष वसुली मोहीम सुरु केली आहे.




मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या आदेशान्वये मंगळवार दिनांक ३० मे रोजी वसुली पथकाने एकूण ०६ गाळे सील करून ५ लाख रुपयांचा कर वसूल केला.

मनपाच्या मालकीच्या सारोळा रोड येथील व्यापारी संकुलातील चार गाळे सील करण्यात आले. गांधी मैदान साईट क्रमांक १११ व ११२ व्यापारी संकुलातील दोन गाळे पथकाने सील केले.या व्यापारी संकुलात २ लाख रुपयांचा कर वसूल झाला. तसेच गांधी चौक व्यापारी संकुल येथील गाळेधारकांकडून ३ लाख रुपयांचा कर वसूल झाला.

शहरातील व्यापारी संकुलात असणाऱ्या ज्या गाळेधारकांकडे थकबाकी आहे त्यांनी आपल्याकडील बाकीचा भरणा तात्काळ करून मनपाला सहकार्य करावे. जे गाळेधारक थकबाकी भरणार नाहीत त्यांच्यावर याच पद्धतीने कार्यवाही केली जाईल,असा इशाराही उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांनी दिला.

## आव्हाडांकडून झालेली चूक गंभीरच, पण...किरण मानेंची पोस्ट चर्चेत



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार गटाचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांनी बुधवारी महाड येथे मनुस्मती दहन आंदोलनादरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पोस्टर फाडले. यामुळे भाजपने आक्रमक पवित्रा घेतला असून आव्हाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केल्याचा आरोप करत त्यांच्याविरोधात राज्यभर आंदोलने सुरू आहेत. दरम्यान, अभिनेते किरण माने यांची आव्हाड यांच्या संबधित पोस्ट चर्चेत आहे. काय म्हणाले किरण माने अनावधानाने जितेंद्र आव्हाड यांच्याकडून झालेली चूक गंभीरच.. आव्हाडांनी आंदोलन करताना काळजी घ्यायला हवी होती आव्हाडांनी माफी मागीतली इथं विषय संपला किरण माने : तो व्हिडीओ पहावतही नव्हता जितेंद्र आव्हाडांकडून अनवधानानं जी चूक झाली ती गंभीरच होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'मनूस्मृती' जाळल्याची आठवण पुन्हा ताजी व्हावी हा हेतू स्तुत्य होता. पण अशा आंदोलनात जे करायचे आहे त्याची योग्य ती खबरदारी न घेतल्याचा रागही आला. खुप वाईटही वाटले. तो व्हिडीओ पहावतही नव्हता . पण या निमित्तानं सतत अर्वाच्य शब्दांत ट्रोलींग करणार्या भक्ताड पिलावळीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी जो पुळका आलेला आहे. तो पाहून आता जाम हसू यायला लागलंय!

आव्हाडांनी माफी मागीतली इथं विषय संपला खरंतर. पण त्यानंतरही यांचा जो थयथयाट सुरू आहे तो फार विनोदी आहे. खरंतर या पिलावळीला कुणी सिरीयसली घेत नाही. त्यांच्या निषेधाला महत्त्व तेव्हा मिळालं असतं जेव्हा एका धोतरवाल्या बेडकानं महात्मा फुले-सावित्रीबाईंची उघड उघड टवाळी केली होती तेव्हाही ते इतकेच पेटून उठले असते. त्यांच्या निषेधाला महत्त्व तेव्हा मिळालं असतं, जेव्हा एका किळसवाण्या झुरळानं महात्मा गांधींच्या मातेच्या चारित्र्याचे हनन केले होते तेव्हा त्यांची संतापानं लाहीलाही झाली असती. त्यांच्या निषेधाला महत्त्व तेव्हा मिळालं असतं, जेव्हा एका दाढीवाल्या बोकडानं माता जिजाऊबद्दल वाईटसाईट लिहीलं होतं तेव्हा त्याचे थोबाड फोडले असते. जितेंद्र आव्हाड यांच्या निमित्ताने शिवशाहूफुलेआंबेडकरांची सतत बदनामी करणार्या पिलावळीला आता झालेली उपरती आणि त्यांचा उच्छाद आमचे मनोरंजन करत आहे हे नक्की. - किरण माने. काय आहे प्रकरण? शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीचा समावेश होत असल्याचा मुद्दा गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी या प्रकरणाचा निषेध करत महाड येथे चवदार तळ्याजवळ आंदोलन केले होते. या आंदोलनावेळी आव्हाडांकडून मनुस्मृती ग्रंथाचे दहन करण्यात आले. याबरोबरच जितेंद्र आव्हाड आणि त्यांच्या कार्यकर्त्यांकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो असलेला पोस्टरही फाडण्यात आले होते. विरोधकांनी आंदोलने करीत आव्हाडांच्या अटकेची मागणी केली आहे. जितेंद्र आव्हाड यांच्याकडून माफी दरम्यान, अनावधानाने माझ्याकडून माझ्या बाबाचा फोटो नकळत फाडला गेला, ही अत्यंत गंभीर चूक असल्याचे सांगत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी तमाम नागरिकांची नतमस्तक होऊन माफी मागितली आहे. तसेच आंबेडकरी अनुयायीही मला माफ करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. या घटनेनंतर त्यांच्या घराभोवती पोलीस सुरक्षा वाढविण्यात आली आहे.

## लोकनेते स्व. विलासराव देशमुख यांच्या ७९ व्या जयंती निमित्त राज्यस्तरीय बुध्दीबळ स्पर्धेचे आयोजन.




लातूर: लोकनेते स्व. विलासराव देशमुख यांच्या ७९ व्या जयंती निमित्त मनोधैर्य सेवाभावी संस्था, लातूर जिल्हा बुध्दीबळ संघटना व राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त) लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने लोकनेते विलासराव देशमुख चेस चॅम्पियनशीप (एक दिवसीय (खुल्या) जलदगती राज्यस्तरीय बुध्दीबळ स्पर्धा आयोजीत करण्यात आली आहे राज्यस्तरीय बुध्दीबळ स्पर्धेचे उद्घाटन दि. ०२ जून २०२४ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय,चंद्रनगर बसस्टन्ड जवळ,लातूर येथे सकाळी ९:३० वा.मान्यवरांच्या हस्ते होणार असून बक्षीस वितरण याच दिवशी स्पर्धा संपल्यानंतर ठेवण्यात आले आहे. लोकनेते विलासराव देशमुख चेस चॅम्पियनशीप -२०२४ या (एक दिवसीय खुल्या जलदगती राज्यस्तरीय बुध्दीबळ स्पर्धा) संस्थेचे अध्यक्ष गायकवाड पवनकुमार व उपाध्यक्ष शेख सिराज यांच्या पुढाकारातून होत असून ही स्पर्धा पार पाडण्यासाठी माजी उपमहापौर कैलास कांबळे, माजी नगरसेवक इम्रान सय्यद, शेख असलम,शेख इरफान,शेख फारुख,शेख महमद, डी.उमाकांत,शेख खाजा पाशा, सचिन वाघमारे,संजय सुरवसे, आकाश मगर,इलीयाज शेख परिश्रम घेत आहेत. प्रथम -११ हजार, द्रितीय ७ हजार तर तृतीय ५ हजाराचे पारितोषिक राज्यस्तरीय होणाऱ्या या स्पर्धेत प्रथम ११ हजार, द्वितीय ७ हजार तर तृतीय ५ हजार असून एकूण आकर्षक ३० पारितोषिक व २० चषक आहेत.एकूण बक्षीसाची रक्कम हजारोंच्यावर असून या स्पर्धा गायकवाड पवनकुमार यांच्या संकल्पनेनुसार लातूर जिल्हयातील व राज्यातील उत्कृष्ट बुध्दीबळ पटू आहेत.त्यांच्या कलेला वाव मिळावा या हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत स्थानिक स्पर्धांकांनी जास्तीत जास्त नाव नोंदणी करुन सहभाग नोंदवावा असे आवाहन मनोधैर्य सेवाभावी संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विनर चेस अकडमी,क्रिडा संकुल लातूर येथे व श्रीराम साने मो. ९८९०८२२५८९/८१४९५३३५५५,अमितकुमार बियाणी मो.९०४९५९५५१०/७३८५४१४७१७,श्रीकांत मंत्री मो. ९२३४१४८८८१,उदय वगारे मो. ८८८८०४५३४४,अनिरुध्द बिराजदार मो. ९९२३२३७८०८, यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# सलग काम करणा-यांच्या नैराश्यात वाढ!

नवी दिल्ली : आजच्या स्पर्धात्मक युगात प्रत्येकाला यश मिळवायचे, करिअर घडवायचे आहे. पण या सगळ्यात तुम्ही तुमच्या आरोग्याची किती काळजी घेता हे देखील पाहणे तितकेच महत्त्वाचे आहे. कारण सिर सलामत तो पगडी पचास या वाक्याप्रमाणे जर तुमचे आरोग्य चांगले असेल तरच तुम्ही काम करू शकता. कारण तासनतास सलग काम करणा-यांच्या नैराश्यात वाढ होत असून त्यांनी मायको ब्रेक घेणे अंत्यत आवश्यक असल्याचा अहवाल नुकताच जाहीर करण्यात आला आहे.आपण ब-याचदा अनेकांच्या तोंडातून ऐकतो, काम संपले की मी आराम करेन असे बोलून बहुतेक जण पुन्हा कामात व्यस्त राहतात. पण असे करणे ही मोठी चूक ठरू शकते. घरगुती आणि कार्यालयीन कामे न थांबता केल्याने तुम्ही आजारी पडू शकता. यामुळे तणाव आणि नैराश्य दोन्ही वाढू शकते. या समस्या टाळायच्या असतील तर मायक्रो ब्रेक्स नक्कीच घ्या. मायक्रो ब्रेक हे छोटे ब्रेक असतात जे तुम्हाला कामावर परत येण्यासाठी रिचार्ज करतात. यामुळे तुमची कार्यक्षमता आणि फोकस दोन्ही वाढते. मायक्रो ब्रेक्स हे छोटे ब्रेक्स आहेत जे तुम्हाला कामावर परत येण्यासाठी रिचार्ज करतात. फक्त एक ते पाच मिनिटे लागतात. आणि ही विश्रांती शनिवार किंवा रविवारच्या विश्रांतीपेक्षा अधिक फायदेशीर असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. हे आपल्याला शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या आराम करण्यास अनुमती देते. हे मायक्रो ब्रेक तुमच्यावर लगेच परिणाम करतात आणि तुम्हाला आराम देतात.

छोट्या विश्रांतीचे फायदे जर्नल ऑन प्रोफेशनल डेव्हलपमेंटनुसार, छोटी विश्रांती घेतल्याने फोकस आणि कार्यक्षमता दोन्ही वाढते. खरे तर, जेव्हा तुम्ही विश्रांतीशिवाय बराच वेळ काम करता तेव्हा तुमचा मेंदू थकतो, ज्यामुळे लक्ष केंद्रित करणे कठीण होते. त्यामुळे थोडा ब्रेक घ्या, तुमचे आवडते संगीत ऐका आणि तुमच्या मित्रांशी किंवा सहका-यांशी बोला. तणाव कमी होण्यास मदत प्रत्येक काम वेळेत पूर्ण करण्याचे दडपण महिलांवर असते. हा ताण आणि दबाव या दोन्ही गोष्टी तुम्हाला नैराश्यात टाकू शकतात, ज्याची बहुतेक महिलांना जाणीवही नसते. अशा परिस्थितीत, फक्त पाच मिनिटांचा ब्रेक तुमची तणाव पातळी कमी करू शकतो. कामाच्या गतीवर परिणाम सतत काम करताना थकवा आला की त्याचा तुमच्या कामाच्या गतीवर परिणाम होतो. अशा परिस्थितीत काहीतरी नवीन विचार करणे कठीण होते. मायक्रो ब्रेक्स नवीन कल्पनांसाठी तुमचे मन रिफ्रेश करतात. या काळात श्वासोच्छवासाचे व्यायाम करावेत. यामध्ये लाइट स्ट्रेचिंग देखील फायदेशीर ठरेल. एनर्जी लेव्हल वाढवतो जास्त वेळ सतत काम केल्याने एनर्जी लेव्हल कमी होते. जर तुम्ही ऑफिसमध्ये जास्त वेळ बसून काम करत असालकिंवा घरातील कामात गुंतले असाल तर मायक्रो ब्रेक्स तुम्हाला एनर्जी लेव्हल वाढवण्याची संधी देतात. यामुळे तुमचे हृदय निरोगी राहते आणि मधुमेहासारखे आजारही दूर राहतात.

# बारणे की वाघेरे?; उत्सुकता शिगेला





पुणे : प्रतिनिधी मावळ लोकसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाचे श्रीरंग बारणे आणि शिवसेना ठाकरे गटाचे संजोग वाघेरे यांच्यात लढत झाली. आता लोकसभा निवडणुकीचा शेवटचा टप्पा बाकी आहे. १ जूनला ७ व्या टप्प्यातील मतदान पार पडताच ४ जूनला मतमोजणी पार पडणार आहे. त्यामुळे आता निकालाची उत्सुकता लागली आहे. या मतदारसंघातून बारणे हॅट्ट्रिक करणार की, नवखे संजोग वाघेरे विजयी होणार, याकडे संपूर्ण मतदारांचे लक्ष लागले आहे. शिवसेनेत फाटाफूट होऊनही या मतदारसंघात दोन शिवसेनेमध्ये चांगली लढत रंगली. त्यामुळे अंदाज बांधणे कठीण आहे.

दरम्यान, मावळ लोकसभा मतदारसंघात आता मतमोजणीची तयारी अंतिम टप्प्यात आहे. पुणे व रायगड जिल्ह्यात विभागलेल्या या मतदारसंघांत दोन शिवसैनिकांत लढत झाली आहे. या मतदारसंघात ५४.८७ टक्के मतदान झाले. घटलेल्या मतांचा कोणाला फटका बसणार, याचे आखाडे बांधले जात आहेत. महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्यासह ३३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. मात्र, मुख्य लढत ही महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशीच आहे.शिंदे गटाचे श्रीरंग बारणे तिस-यांदा निवडून येण्यासाठी मैदानात होते तर संजोग वाघेरे हे प्रथमच आपले नशीब आजमावत आहेत. वाघेरे हे राष्ट्रवादीचे नेते होते. परंतु लोकसभेच्या पार्श्वभूमीवर ते ठाकरे गटात सामिल झाले आणि त्यांनी बारणे यांच्यासमोर तगडे आव्हान उभे केले. त्यांना राष्ट्रवादी अजित पवार गटाची छुपी साथ मिळाल्याचेही सांगितले जात आहे. कारण काहीही असो. परंतु त्यांनी बारणे यांना मोठे आव्हान दिल्याने सहजासहजी अंदाज बांधणे कठीण आहे. त्यामुळे या निकालाबाबतची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.येत्या ४ जून रोजी बालेवाडी पुणे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील वेटलिफ्टिंग हॉलमध्ये निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतमोजणी पार पडणार आहे. याठिकाणी सुरक्षा कक्षात ईव्हीएम यंत्रे व टपाली मतपेट्या ठेवण्यात आल्या आहेत. मतमोजणीच्या दिवशी या सुरक्षा कक्षाचे सील निवडणूक निरीक्षक, निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तसेच मावळ लोकसभा निवडणुकीतील उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत उघडण्यात येऊन स ाळी ८ वाजेपासून प्रत्यक्ष मतमोजणीला सुरुवात होईल.मावळ लोकसभा मतदारसंघातील सहाही विधानसभा मतदारसंघनिहाय स्वतंत्रपणे मतमोजणी टेबल लावण्यात येणार आहेत. पनवेल आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघासाठी प्रत्येकी २४ टेबल लावण्यात येणार असून मतमोजणीसाठी २३ फे-या होणार आहेत. कर्जत आणि उरण विधानसभा मतदारसंघासाठी प्रत्येकी १४ टेबल आणि २४ फे-या तर मावळ आणि पिंपरी विधानसभा मतदारसंघासाठी १६ टेबल लावण्यात येणार असून २५ फे-या होणार आहेत. टपाली मतपत्रिकांच्या मोजणीसाठी स्वतंत्र ५ टेबल याप्रमाणे एकूण ११३ टेबलवर मतमोजणी होईल. प्रशासनाने सर्व तयारी केल्याने आता निकालाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

## राधानगरी ओलवण-भटवाडी बॅकवॉटरमध्ये तिघेजण बुडाले

राशिवडे; राधानगरी धरणाच्या ओलवण-भटवाडी येथील बॅकवॉटरमध्ये बुडून ३ पर्यटकांचा मृत्यू झाला. ही घटना आज सकाळी उघडकीस आली. एकजण पाण्यात बुडत असताना त्याला वाचवताना तिघांचा बुडून मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद राधानगरी पोलीस ठाण्यात झाली आहे.



बुधवारी सतिश लक्ष्मण टिपुगडे (वय २६, रा. भैरीबांबर ता. राधानगरी, सध्या रा. एम.आय. डी.सी.कागल) यांनी ओलवण येथील आपल्या नातेवाईकांना भाकरी करण्यास सांगितले होते. भटवाडी बॅकवॉटरजवळ जेवण करण्याचा बेत त्यांनी आखला होता. त्यांच्यासोबत अश्विनी राजेंद्र मालवेकर (वय ३२), प्रतिक्षा राजेंद्र मालवेकर (वय १३) या दोघी होत्या. भाकरी नेण्यास सतिश का आला नाही, हे पाहण्यासाठी नातेवाईक गेले असता त्याठिकाणी सतिशचा मृतदेह तरंगताना दिसला. तर आज सकाळी अश्विनी व प्रतिक्षा या दोघींचे मृतदेह आढळून आले. या घटनेची नोंद राधानगरी पोलीस ठाण्यात झाली असून अधिक तपास पो. नि. संतोष गोरे करत आहेत.

# मिस्त्री कामगार व महीला हत्या प्रकरणी मारेकऱ्यावर गुन्हा दाखल ,

किनवट.प्रतिनिधी.(शेख शौकत) शहरापासून ५ कि.मी.च्या अंतरावर असलेल्या आंबाडी येथे मिस्त्री काम करणाऱ्या एका तरुणाचा अंबाडी येथील इसमाने डोक्यात फावड्याने मारून खुन केला. तर एका महिलेस गंभिर जखमी केल्याची घटना दिनांक २९ मे रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास घडली. हि बातमी किनवट शहरात वा-यासारखी पसरताच तनावाचे वातावरण निर्माण झाले होते. दिनांक २९ मे रोजी मयत वसिम शेख महेबुब खुरेशी वय २२ वर्षे रा. इस्लामपूरा किनवट हा अंबाडी येथे आरोपी उत्तम भरणे यांच्या घराचे बांधकाम चालु असल्याने त्यांच्या घराच्या बांधकाम करण्यासाठी गेला होता. त्या दोघांमध्ये पाणी मागण्याच्या कारणावरुन बाचाबाची झाली असता उत्तम गणपत भरणे वय ५२ वर्षे यांनी मयत वसिम शेखच्या डोक्यात व पोटावर फावडयाने मारून खुन केला. त्याच्या शेजारी राहाणाऱ्या विशाखा भारत मुनेश्वर वय ५३ वर्षे रा. अंबाडी यांना ही फावडयाने मारून गंभिर जखमी केल्याची घटना सायंकाळी ५ वाजता घडली. जखमी विशाखास उपचारासाठी तेलंगाणा येथील अदिलाबादला पाठविण्यात आले होते पण उपचारादरम्यान जखमी महिलेचा मृत्यू झाला हि माहिती



किनवट येथील मयताच्या नातेवाईकांना समजताच उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथे मयताचे प्रेत आणले होते. ते प्रेत घेवून जवळपास २०० ते ३०० जमावाने सरळ किनवट पोलिस स्टेशन पुढे आणुन ठेवले होते. काही तास किनवट शहरात तनावाचे वातावरण निर्माण झाले होते. आरोपीस पोलिस निरीक्षक सुनिल बिर्ला यांनी त्वरीत ताब्यात घेवून जमावास शांत करून प्रेत शवविच्छिदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. दि. ३० मे रोजी दुपारी १२ वाजता पोलिस बंदोबस्तात मयत वसिम शेख यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. मयतचा भाऊ मोबीन कुरेशी महबुब कुरेशी वय ३२ यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुरनं १४०/२४ आयपीसि कलम ३०२ नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक सुनील बिर्ला हे स्वतः करीत आहेत.

# कापूस बियाणे विक्रीत 'कापश्या घोळ'

किनवट/शेख शौकत :- मान्सूनची चाहूल लागताच शेतकऱ्यांनी बि-बियाणे खतांसाठी बाजारात गर्दी केली आहे. परंतु बि- बियाणे खरेदी करणाऱ्या शेतकऱ्यांची उघडपणे फसवणूक करण्यात येत असून जादा दराने बि-बियाणे विक्री करण्यात येत आहेत. या प्रकाराची चौकशी करावी अशी मागणी होत आहे.शेतकऱ्यांनी मशागतीची कामे पुर्ण केली असून शेतकरी पावसाची वाट बघण्याबरोबरच बि-बियाणे, खतांच्या खरेदीमध्ये गुंतला आहे. सध्या कापूस बियाणांची मागणी वाढली आहे. या मागणीचा फायदा घेत बि-बियाणे विक्रेते जादा दराने बि-बियाणांची विक्री करत आहेत. विशेष म्हणजे हा प्रकार संपूर्ण तालुक्यात सुरु आहे. कबड्डी कॉटन हे ८६४ रुपयांना मिळणारे बियाणे १ हजार १०० रुपयांत विक्री करण्यात येत आहे. याच प्रमाणे संकेत कॉटन ८६४ ऐवजी २ हजार, ६७.७० नाथ सिड्स ८६४ ऐवजी १ हजार २०० तर सुपर कॉटन ८६४ ऐवजी १ हजार २०० रुपयांत विक्री होत आहे. विशेष म्हणजे खत विक्रेते हा प्रकार उघडपणे तसेच शेतकऱ्यांना ठणकावुन सांगत करीत आहेत. जास्तीचे रक्कम घेण्यात येत असली तरी बिल मात्र निर्धारित किंमतीचे देण्यात येत आहे. हा प्रकार खुलेआमपणे तालुक्या भरात सुरु आहे. जिल्हा कृषी व अधिकारी तालुका कृषी अधिकारी किर्तनात रमल्याची चर्चा तालुक्यातील कृषी केंद्र चालक उघडपणे शेतकऱ्यांची लुट करत असताना जिल्हा कृषी अधिकारी व तालुका कृषी विभागाकडून मात्र कुठलीही कारवाई करण्यात आली नाही. शेतकऱ्यांची लुट तसेच बोगस बियाणे विक्री होत असतानाही कुठलीही कारवाई करण्यात येत नसल्याने जिल्हा कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी कीर्तनात रमले की, काय अशी चर्चा शेतकऱ्यांमध्ये सुरु आहे.

## आ.आव्हाड व मंत्री केसरकरांचा वंचित बहुजन आघाडी कडून निषेध.




लातूर - डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा असलेला फोटो राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी फाडल्याचा निषेध तसेच मंत्री दीपक केसरकर यांनी अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक समाविष्ट करावी या वक्तव्याचा निषेध वंचित बहुजन आघाडी लातूर शहर च्या वतीने शहरातील महात्मा गांधी चौक येथे व्यक्त करण्यात आला. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे ,लातूर शहर जिल्हाध्यक्ष सचिन गायकवाड, शहर महासचिव इसाक शेख, शहर संघटक रतन टेंकाळे,शहर सचिव मनोज लेंढाने, धरणीदर सोनवणे,विशाल कांबळे, शहरआयटी प्रमुख विशाल सुरवसे, शहर प्रसिद्धीप्रमुख विशाल सुरवसे, सद्दाम पठाण,अमोल करवजे,महिला शहराध्यक्ष सुजाताई अजनीकर,सामाजिक कार्यकर्ते नूतन हनुमंते व सहकारी जिल्हा महासचिव ड.रोहित सोमवंशी, जिल्हा सचिव प्रशांत उघाडे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सुरेशभाऊ सूर्यवंशी,लातूर तालुकाध्यक्ष सुनील कांबळे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष एम एम बलांडे गुरुजी , समता सैनिक अभिमन्यू लामतुरे,संग्राम माने,दादासाहेब मस्के,शुभम बनसोडे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## समिती कडून गुणवंतांचा सत्कार



लातूर :--- लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या वतीने इ १० परीक्षेत घवघवीत यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न लातूर शहर पूर्व भागातील कु तनुजा नंदकिशोर गंगणे हिने इ १० वी त ९२ . ८० % टक्केवारी घेऊन यश संपादन केले तर चि हरिओम दत्तात्रय तपासे या विद्यार्थ्याने इ १० परीक्षेत ८५ % टक्केवारी घेऊन घवघवीत यश प्राप्त केल्या बद्दल आज गरुड चौकात लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या वतीने यशवंत विद्यार्थ्यांना शॉल , पुष्पहार, गुच्छ देऊन पेढा भरवत सत्कार करून पुढील वाटचाली करिता शुभेच्छा देण्यात आल्या या वेळी समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे, रेणुका हातांगळे, विनोद गंगणे, मंदा तपासे, शोभा गंगणे,कांताबाई सौदागर, सदाशिव चापेकर, नंदकिशोर गंगणे, बाबासाहेब धनगर,शिवाजी अंबेगावे ,रेणुका गंगणे,दिगंबर कसबे गणेश घोडके दयानंद कांबळे इत्यादी उपस्थित होते

## सार्वजनिक जयंती उत्सव मंडळाच्या वतीने बुद्ध जयंती मोठ्या उत्साहात संपन्न



शिवडी :- सार्वजनिक जयंती उत्सव मंडळ संलग्न महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने तथागत भगवान गौतम बुद्ध यांची २५६८ वी जयंती जयभीम स्तंभ, शिवडी येथे निखिल संजय भालेराव यांच्या अधिपत्याखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाली. सदर प्रसंगी अत्यंत लाघवी व रसाळ वाणीने योगिता अहिरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, निखिल भालेराव यांनी धार्मिक विधी संपन्न करून कार्यक्रमाची सुरुवात केली त्यावेळी बृहन्मुंबई महानगरपालिका एफ/दक्षिण विभागाचे स्वच्छता निरीक्षक सि. बा. जाधव यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. संध्याकाळच्या सत्रात भारतीय बौद्ध महासभा व शिवडी बुद्धविहाराचे बौद्धाचार्य सुभाष कटारनवरे यांनी तथागत गौतम बुद्धांच्या जन्मापासून ते महापरिनिर्वाण पर्यंतचा संपूर्ण जीवनपट साध्या, सोप्या व कोणालाही सहज समजेल अश्या पद्धतीने आपल्या प्रवचनात मांडला. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेणारे सचिव विलास गांगुर्डे, सूनयना कदम, उपाध्यक्ष अश्विनी पगारे, सहखजिनदार संतोष लोखंडे, सविता पगारे, मनीषा कदम, सहउपाध्यक्ष स्वप्नील अहिरे, माजी अध्यक्ष प्रविण तांबे, सहसचिव अमोल सोनवणे, जेष्ठ सल्लागार सुमन खरे, सल्लागार संतोष जाधव, पुष्पा रणखांबे, माजी खजिनदार नलेश गवारे, जनसंपर्क अधिकारी बाळू खैरे, सभासद चंद्रकांत पगारे, आशिष पगारे, अक्षय पवार, राहुल इंगळे, निकेश कदम तसेच देणगीदार, दुकानदार, व्यापारी व शुभचिंतक या सर्वांचे योगिता अहिरे यांनी आभार मानून सरणेतय गाथा घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## सौ. कांचन प्रकाश कासे यांचे आकस्मिक निधन

परेल दि. ३० (अधिराज्य) बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. २३८ च्या जेष्ठ सदस्या, बोधिसत्व सेवा संघ, माता रमाई महिला मंडळ यांच्या अध्यक्षा तसेच बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. २३८ चे माजी चिटणीस, मार्गदर्शक, सल्लागार, गट क्र. १३ चे माजी गट प्रतिनिधी, बौद्धजन पंचायत समिती मध्यवर्ती कार्यालय पतपेढीचे चिटणीस आदरणीय प्रकाशजी कासे यांच्या सुविद्य पत्नी व कासे परिवाराच्या कुटुंबवत्सल माता सौ. कांचन प्रकाश कासे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. कालकथित सौ. कांचन कासे ह्या हसतमुख, सर्वसमावेशक,मनमिळाऊ व प्रेमळ स्वभावाच्या, मायाळू माता होत्या, गोडवाणी व लाघवी मधाळ बोलीने जनमानसात त्यांनी स्वतःचा असा वेगळा ठसा उमटवला होता त्यामुळे त्यांच्या अचानक जाण्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. कालकथित सौ. कांचन कासे यांच्या अंत्यदर्शनासाठी गाव व मुंबईतील अनेक कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली होती. कालकथित सौ. कांचन कासे यांचा जलदानविधी व शोकसभेचा कार्यक्रम दि. ०२ जून २०२४ रोजी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, भोईवाडा, परेल, मुंबई - १२ येथे बौद्धजन पंचायत समिती, शाखा क्र. २३८ च्या अधिपत्याखाली बौद्धाचार्य मनोहर गोपाळ जाधव यांच्या संचालनाखाली आयोजित करण्यात आली आहे, सदर प्रसंगी आदर्श माता कालकथित कांचन कासे यांना भावश्रध्दांजली अर्पण करण्यास बौद्धजन पंचायत समिती मध्यवर्ती कमिटी तसेच सर्व शाखांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, कार्यकर्त्या उपस्थित राहणार आहेत तरी कालकथित सौ. कांचन कासे व प्रकाश कासे यांच्या सहवासात असणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांनी, स्नेही, आप्तस्वकीयांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आदर्शांस श्रद्धांजली अर्पण करावी असे आवाहन बौद्धजन पंचायत समिती, शाखा क्र. २३८ च्या वतीने काढण्यात आलेल्या परिपत्रकात करण्यात आली आहे.



## लातुरकन्या कु.डॉ.वैभवी कांबळेचा बुलढाण्यात सन्मानपत्र देवुन गौरव.

लातूर :- लातुरकन्या कु.डॉ.वैभवी कांबळेचा बुलढाण्यात सन्मानपत्र देवुन गौरव.दि.२७/५/२०२४सोमवारी सम्राट अशोक बुद्ध विहारात जनीय भिक्खु संघाच्या भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकारीसम्राट अशोका बहुद्देशीय बुद्धीष्ट चॅरीटेबल ट्रस्ट,भिमज्योती येकदिल मित्रमंडळ आणि समस्त गावकरी यांच्या प्रयत्नातुन स्वबळावरती सुंदर बुद्ध विहार निर्माण करत बुद्धभिमाच्या मुर्तीची प्रतिष्ठापना केली.यावेळी रमाईकार कु.डॉ.वैभवी घारगावकर,लातुरने तिचा मी रमाई बोलतेय..!चा१८३वा नाट्यप्रयोग सादर केला.नि भिमरमाईचा संदेश आश्रुपुर्ण नयनांनी रसीक श्रोत्यांच्या रुदयात कोरत धम्मपथावरुन धम्माचरणाने चालण्याचा संकल्प प्रबुद्ध होत प्रबुद्ध भारत घडविण्या कामी समर्पीत होण्याचा विचार तिच्या अप्रतीम प्रतिभासंपन्न नैसर्गीक अभिनयातुन सादर केला.तेंव्हा तिला भारतीय बौद्ध महासभा नि संयोजक समीतीने सन्मानपत्र देवुन गौरव केला.तिने जवळपास रमाई,जिजाऊ,सावित्री माईच्या जिवनावरील २७१येकपात्री नाट्यप्रयोग सादर करत विक्रम प्रस्थापीत केलेला आहे.सदरील वृत्त जनहितार्थ आपल्या नामांकीत वृत्तपत्रातुन प्रकाशीत करून सहकार्य करावे ही विनंती.आपलाच विलास घारगावकर,लातुर



## पिंपळगाव येथील तरुणाचा विहीरीजवळ पाय घसरला आणि जीवाला मुकला

देवळा (जि.नाशिक) : तालुक्यातील पिंपळगाव (वा.) येथील एका तरुणाचा विहिरीत पाय घसरून पडल्याने मृत्यू झाला आहे. ही घटना गुरुवार (दि .२९) रोजी निबोंळा (ता. देवळा) येथे रात्री ९.१५ च्या सुमारास घडली.पिंपळगाव (वा.) येथील गणेश पगार यांचा अर्थमुव्हिंगचा व्यवसाय आहे. त्यांचे स्वमालकीचे जेसीबी निंबोळा (ता.देवळा) येथे सुरू आहे. या जेसीबीसाठी लागणाऱ्या इंधनासाठी पगार यांचा मुलगा दर्शन (वय २०) निबोंळा येथे गेला होता. इंधन दिल्यानंतर परत येत असताना परिसरातील विहिरीत दर्शनचा पाय घसरला आणि तो पडला. पडताच क्षणी त्याच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्याचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. दर्शनाचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी मालेगाव येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. दर्शनाच्या आकस्मिक मृत्यूची नोंद मालेगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. गणेश पगार यांचा दर्शन हा एकुलता एक मुलगा होता. अतिशय शांत स्वभावाच्या या तरुणाच्या निधनाने पंक्रोशीतील नागरिकांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# तिव्र निषेध करीत आमदार जितेंद्र आव्हाडाचा पुतळा जाळला..

अहमदपूर :- महाड येथे अंदोलनाची स्टंटबाजी करीत असताना शरद पवार गटाचे राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड याने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडून त्यांचा अवमान केला आहे.या घटनेचा निषेध करीत येथील सम्राट मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी पदाधिकाऱ्यांनी आमदार जितेंद्र आव्हाड याच्या पुतळ्यास जोडे मारले तसेच पूतळा जाळून निषेध केला. जिथं जिथं जितेंद्र आव्हाड जाईल तिथे त्याच्या तोंडाला भिमसैनिकांनी काळे फासावे असे अवाहनही केले. तसेच स्टंट बहाद्दर जितेंद्र आव्हाडावर गून्हा दाखल करण्याची मागणी केली. या अंदोलनात सचिन बानाटे,रितेश रायभोळे,दिलीप सोनकांबळे विशाल शिंदे,वैभव सोनकांबळे, सुमित कांबळे,दिनेश तिगोटे,सुशांत गायकवाड,अभय गायकवाड रोहन गायकवाड,सुरज रायभोळे अभय गुळवे,जय गूळवे,अजय आचार्य,अजिंक्य बनसोडे सुनील बनसोडे,छकुल सरवदे आदींनी सहभाग नोंदविला.





अत्यंत संवेदनशीलतेने निषेध करीत अंदोलन करणाऱ्या सम्राट मित्र मंडळाच्या पदाधिकारी कार्यकर्ते यांचे अभिनंदन केले.

## लातूर शहर भाजपाच्या वतीने जितेंद्र आव्हाड यांचा निषेध



लातूर :- राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडून अवमान करण्याचे नीच कृत्य केले आहे. यावरून आव्हाडांची संविधान विरोधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबतची द्रेश हि मानसिकता दिसून येते आहे. जितेंद्र आव्हाडचा या कृत्याचा लातूर शहर भारतीय जनता पक्षाच्या वतीने लातूर शहर जिल्हाध्यक्ष श्री. देविदास काळे यांच्या नेतृत्वात बाबासाहेब आंबेडकर चौक येथे जितेंद्र आव्हाड याची प्रतिमा दहन करून निषेध व्यक्त केला. यावेळी जितेंद्र आव्हाड याच्या निषेधाच्या घोषना देण्यात आल्या. यावेळी अजित पाटील कव्हेकर, दिग्विजय काथवटे, गणेश गोमचाळे, रागिणीताई यादव, रवी सुडे, प्रदीप मोरे, बाबा गायकवाड, किशोर काळे, भरत लोंढे, राजू सोनवणे तसेच पक्षातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE